महा मेट्रो

NAGPUR METRO

# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## स्वयंचलित प्रणाली करिता मेट्रो स्थानकांवर तिकीट वेंडिंग मशीन



नागपूर: शाळा, महाविद्यालये आणि इतर शैक्षणिक संस्थांसाच्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या लक्षात घेता महा मेट्रो नागपूरने प्रवासी भाड्या मध्ये बदलाव केले आहे. सदर नवीन प्रवासी तिकीट रचना 1 मार्च 2024 (शुक्रवार) पासून लागू होणार असून नवीन तिकीट दर प्रणाली सध्याच्या भाड्याच्या तुलनेत 33% ने कमी असणार आहे.

या सोबतच येत्या काळात महा मेट्रो प्रवाश्यांकरिता `कॅश बॅक' ची संकल्पना लागू करणार असून या अंतर्गत जास्त प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना ही सोय मिळणार आहे. या सेवेंतर्गत एका महिन्यात महा कार्ड वापरणाऱ्या प्रवाश्याने मेट्रोने प्रवास करत तिकीट दराच्या माध्यमाने एकूण ८०० रुपये पेक्षा जास्त प्रवासी भाड्यात खर्च केल्यास, त्याला १०% गुण (पॉईंट, पॉईंट्स) मिळणार असून `कॅश बॅक' च्या माध्यमाने तो मिळणार आहे. महत्वाचे म्हणजे महा कार्ड वर मिळणाऱ्या १० % सूट मध्ये कुठलाही बदल नसून या सुट (१०%) (सोबत `कॅश बॅक' मिळणार आहे. या योजनेला अंतिम स्वरूप देणे सुरु आहे.

महत्वपूर्ण आहे कि, प्रस्तावित नवीन भाड्यामुळे इतर कुठल्याही सवलतीवर याचा प्रकारचा परिणाम होणार नसून महा मेट्रोद्वारे विध्यार्थ्यांना प्रदान करण्यात येत असलेली 30% सवलत ही तशीच राहणार आहे. नागपूर हे देशातील सर्वात उष्ण शहरांपैकी एक असून उन्हाळ्यातील

तापमान अनेकदा 40 सेल्सिअसच्या पार करत असते व शहरातील रस्ते रिकामे होऊन नागरिक कमी प्रमाणात घरा बाहेर पडत असतात.

महा मेट्रोने प्रवासी भाड्या मध्ये बदल करून एका प्रकारे कमी भाड्यात वातनुकूलित मेट्रो डब्यांमधून प्रवास करून उष्णतेवर मात करण्याची संधी दिली आहे.आता नागपूरकर या उन्हाळ्यात आरामात प्रवास करत हरित वाहतुकीच्या साधनाला स्वीकार करत चांगले वातावरण बनवू शकतील. प्रस्तावित नवीन भाड्याच्या संरचनेनुसार विद्यार्थ्यांना 30% सवलत लागू होईल.

● महा मेट्रोच्या भाडे दरात केलेली सुधारणा पुढील प्रमाणे:

सध्यास्थितीत सिताबर्डी इंटरचेंज ते लोकमान्य नगर पर्यंत मेट्रोने प्रवास केल्यास 30 रुपये द्यावे लागतात जे कि आता 25 रुपये एवढे असतील व 30% विध्यार्थी सवलतीसह हे 18 रुपये एवढे असेल.

उल्लेखनीय आहे कि, नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फ़ेज-1, 11 डिसेंबर 2022 रोजी माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते खापरी मेट्रो स्टेशन येथून हिरवी झेंडी दाखवीत नागपूरकरांना समर्पित करत कार्यान्वित करण्यात आला. 40.02 किमीचा हा संपूर्ण प्रकल्प ज्यामध्ये 36 कार्यरत मेट्रो स्टेशनचा समावेश आहे (एकूण स्थानकांची संख्या - 38)

अलीकडच्या काळात, नागपूर मेट्रोची रायडरशिप ७५ हजारच्या आसपास असून, पूर्वीप्रमाणेच सव्वा लाखापर्यंत मिळवणे हा या सुसूत्रीकरणाचा उद्देश आहे. याच महिन्यात म्हणजे 5 फेब्रुवारी रोजी रायडरशिप 95,000 एवढी होती. 1 जानेवारी 2023 रोजी महा मेट्रोची आतापर्यंतची सर्वाधिक प्रवासी संख्या 2.2 लाख एवढी होती. महा मेट्रोने प्रवासी संख्या वाढवण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या असून यामध्ये विकेंड सवलत (३०%), राजपत्रित सुट्टी सवलत(३०%), डेली पास (केवळ १०० रुपयात) उपाय योजना केल्या आहेत.

महा मेट्रोने नुकतेच कस्तुरचंद पार्क,  दोसर वैश्य चौक, प्रजापती नगर, शंकर नगर, लोकमान्य नगर, छत्रपती नगर, जय प्रकाश नगर आणि उज्वल नगर या 8 मेट्रो स्थानकांवर फिडर ऑटोरिक्षा सेवा सुरू केली आहे या व्यतिरिक्त नागपूर मेट्रो,नागपूर महानगर पालिका (NMC) आणि मिहान इंडिया लिमिटेडच्या संयुक्त विधमानाने विमानतळ ते एयरपोर्ट मेट्रो स्टेशनपर्यत शटलबस सुरू केली आहे.

सध्या खापरी, प्रजापती नगर, ऑटोमोटिव्ह चौक आणि लोकमान्य नगर या चार टर्मिनल स्थानकांवरून दररोज सकाळी 6 ते रात्री 10 या वेळेत दर 15 मिनिटांनी (सकाळी 8 ते 11 आणि सायंकाळी 4 ते 7 वाजता दरम्यान) दर 10 मिनिटांनी सुरु असून सदर हेडवे देखील कमी करण्याचा महा मेट्रोचा मानस आहे.